# अधिदान व लेखा कार्यालय

महाराष्ट्र शासन

☎ ०२२ - २६ ५९ २२ ९३/९४
e-mail : pao@mahakosh.in
Fax No. ०२२ – २६५९११५८८

लेखा कोष भवन, ए विंग
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

क्र.अले/आस्था/एच/जडसंग्रह निर्लेखन/फा.क्र.२६ब/परि.43 दि. 01 MAR 2016

**जडसंग्रह वस्तूंची (फर्निचर) लिलावाने विक्री**

अधिदान व लेखा कार्यालयातील जुने विना वापरातील जडसंग्रह वस्तू (फर्निचर) लिलावाद्वारे विक्री करुन निर्लेखित करावयाचे आहे. विक्री करावयाच्या साहित्याची एकूण पुस्तकी किंमत रु.८,१४,५६३/- इतकी असून सदर वस्तूंच्या निर्लेखनास शासनाची मान्यता. मिळाली आहे. ज्या पक्षकारांना / संस्थांना सदर साहित्य खरेदी करावयाचे आहे. त्यांना सदर साहित्य दि.०८ मार्च २०१६ ते दि.१५ मार्च २०१६ या कालावधीत कार्यालयीन कामकाजाचे दिवशी दुपारी २ ते ४ या वेळेत पहाता येईल.

लिलाव विक्रिची सूचना, अटी व शर्ती www.mahakosh.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर तसेच कार्यालयीन सूचना फलकावर लावण्यात आल्या आहेत. ज्यांना लिलावाच्या अटी व शर्ती मंजूर असतील अशा व्यक्ती / संस्थांनी लिलावात सहभागी व्हावे. लिलाव दि.१६ मार्च २०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता अधिदान व लेखा कार्यालयात होईल.

(चं.बा.बिवलकर)
**अधिदान व लेखा अधिकारी**
**तथा लिलाव समिती अध्यक्ष**

D:\H CHARGE\H charge\Dead Stock Write Off.doc

# अधिदान व लेखा कार्यालय

महाराष्ट्र शासन

☎ ०२२ - २६ ५९ २२ ९३/९४
e-mail : pao@mahakosh.in
Fax No. ०२२ – २६५९१५८८

लेखा कोष भवन, ए विंग
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

---

क्र.अले/आस्था/एच/जडसंग्रह निर्लेखन/फा.क्र.२६ब/परि-५५ दि. 01 MAR 2016

## लिलाव विक्रीची सूचना

अधिदान व लेखा कार्यालयातील जुने व निकामी झालेल्या जडसंग्रह वस्तूंची लिलावाने विक्री करावयाची असून त्यांचे एकूण पुस्तकी मुल्य रु.८,१४,५६३/- इतके आहे. त्याचे विवरणपत्र सोबत जोडण्यात आलेले आहे. सदर निकामी वस्तूंसाठी दर हे एकदम द्यावयाचे आहेत. जास्तीत जास्त लिलावाचा देकार (दर) देणाऱ्यास सामान (वस्तू) देण्यात येतील. ज्या व्यक्तीचे/संस्थेचे दर स्वीकारण्यात येवून मंजूर केले जातील, त्यातील त्यांचे दर मंजूर केल्यानंतर लिलावाची रक्कम आगाऊ रोख / धनाकर्ष स्वरुपात तीन दिवसाच्या आत भरुन निकामी सामान घेऊन जाणे बंधनकारक राहील. अन्यथा त्यांचे दर रद्द करुन निकामी सामानाची विक्री अन्य संस्थेस/ व्यक्तीस करण्याचे अधिकार हे कार्यालय राखून ठेवीत आहे. तसेच सदर संस्थेची / व्यक्तीची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

कोणतेही दर मंजूर वा रद्द करणे तसेच लिलावाची कार्यवाही कोणत्याही स्तरांवर थांबविणे हे कार्यालयाचे हक्क अबाधित राहतील तसेच याबाबत कोणतीही कारणमीमांसा केली जाणार नाही.

ज्यांना लिलावाच्या अटी व शर्ती मंजूर असतील अशा व्यक्तींनी / संस्थांनी लिलावात सहभागी व्हावे. लिलाव दि.१६.०३.२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता अधिदान व लेखा कार्यालयात होईल. सहभागी व्यक्तींनी / संस्थांनी विहित वेळेत उपस्थित राहावे.

पुढे नमूद केलेल्या विहित अटी आणि शर्ती यांचे अधिन राहून लिलावास मंजूरी देण्यात येईल.

## अटी व शर्ती

१) ज्या व्यक्तीस / संस्थेस लिलावात भाग घ्यावयाचा आहे. त्यांनी रु.५,०००/- रक्कमेचा धनाकर्ष "PAY AND ACCOUNTS OFFICER, ,MUMBAI" यांच्या नावे लिलावाच्या दिवशी कार्यालयात जमा करावा. अयशस्वी बोलीदारांचे धनाकर्ष त्याच दिवशी लिलाव संपल्यावर परत करण्यात येतील.

२) ज्या व्यक्तीचा / संस्थेचा देकार मंजूर करण्यात येईल. अशा व्यक्तींनी / संस्थांनी निकामी सामान कार्यालयाच्या आवारात व आवारातून बाहेर नेतांना वाहतूकीचा, हमालीचा व सामान हाताळणीचा खर्च स्वंत: सोसावयाचा आहे.

३) निकामी सामान कार्यालयीन इमारत / आवारातून बाहेर नेतांना कार्यालयीन कामकाजात कोणता अडथळा येणार नाही याची दक्षता घ्यावी.

४) निकामी सामान कार्यालयीन इमारत / आवारातून बाहेर नेतांना कार्यालयीन वस्तूंची मोडतोड झाल्यास त्याची नुकसान भरपाई रोखीच्या स्वरुपात त्याच ठिकाणी वसूल करण्यात येईल.

५) निकामी सामान जेथे आहे, ज्या अवस्थेत आहे, त्या अवस्थेत घ्यावे लागेल.

६) निकामी सामान कार्यालयीन आवाराच्या बाहेर त्वरीत नेणे बंधनकारक राहील.

७) जुने निकामी सामान पहावयाचे झाल्यास ८ मार्च २०१६ ते १५ मार्च २०१६ या कालावधीत कार्यालयीन कामकाजाचे दिवशी दुपारी २ ते ४ या वेळेत पाहता येईल.

८) ज्या व्यक्तींच्या / संस्थेच्या लिलावाची बोली सर्वात जास्त असेल अशा पक्षकाराने सर्वात जास्त रक्कम बोली केलेल्या एकूण रकमेच्या २५% रक्कम लिलाव संपल्यानंतर त्याच दिवशी रोखीने किंवा धनाकर्ष स्वरुपात कार्यालयात भरणा करणे बंधनकारक राहील.

(चं.बा.बिवलकर)
**अधिदान व लेखा अधिकारी**
**तथा लिलाव समिती अध्यक्ष**

**प्रत :-**

१) कार्यालयीन सूचना फलक वांद्रे / नरीमन पॉईंट
२) अतिरिक्त प्रत.